**नि.फौ.ख.क्र.८८१/२०२५**

**निशाणी क्र. १४**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** सचिन ज्ञानदेव गवळी

**वयः** ३७ वर्षे, **व्यवसायः** मजुरी.

**पत्ताः** मौजे भोंडणी, ता. इंदापूर, जि. पुणे.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु</u>**

मी आरोपीस ओळखतो. आरोपीची दुध डेअरी असल्याने मी त्याला ओळखतो. दिनांक १८/०९/२०२५ रोजी रात्री १०:०० वाजणेच्या सुमारास माझ्या घराच्या जवळ चौधरी यांचा ऊसाचा ट्रॅक्टर पलटी झाला होता. ट्रॅक्टर पलटी झाल्यावर माझ्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर मी पोलीस ठाणे येथे जाउन गैरसमजूतीतून आरोपीविरुध्द तक्रार दिली होती. आता मला माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादी जबाबातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी क्र. १५** देण्यात येते.

(सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी मदत करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. विनंतीवरून भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे परवानगी देण्यात येते.)

**<u>उलटतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०९/२०२५ रोजी रात्री १०:०० वाजणेच्या सुमारास माझ्या घराजवळ ऊसाचा ट्रॅक्टर पलटी झाला होता व ते पाहणेसाठी मी त्याठिकाणी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी आरोपी दारु पिउन येउन काही कारण नसताना शिवीगाळ करुन हाताने, काठीने मारहाण करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी रुग्णवाहिका बोलाविली व दवाखान्यात जाउन उपचार घेतले. हे म्हणणे खरे नाही की, उपचार घेतल्यानंतर मी पोलीस ठाणे येथे गेलो व घडल्याप्रकाराबाबत आरोपीविरुध्द तक्रार दिली. आता मला पोर्शनमार्क 'अ' मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला. सदर मजकूराबाबत मला माहिती नाही. पोर्शनमार्क 'अ' मधील मजकूर माझ्या जबाबामध्ये का नमुद केला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/०९/२०२५ रोजी मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला हाताने व काठीने मारहाण केल्यामुळे दुखापत झाली होती.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझेमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली

असून सदर तडजोड पुरसिस निशाणी क्र. १३ वर दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, तडजोड झालेमुळे आरोपीविरूध्द माझी काहीएक तक्रार राहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझेमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेने घटना घडली असून देखील मी घटनेबाबत काहीही सांगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीचे वकील श्री. आर.यु. चौधरी यांनी उलटतपास नाकारला.**

सबब, उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/-

ठिकाणः इंदापूर

(एस. बी. लेंडवे)

दिनांकः ०७/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.